दिनांक २७/०४/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आलोसे १) रविंद्र वांडेकर, पद - कृषी सहाय्यक, तालुका कृषी कार्यालय गंगापूर अंतर्गत जंभाळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे १,४५,०००/- रु लाचेची मागणी करुन आरोपी २) किशोर कांडेकर, खाजगी इसम याचे मार्फतीने १,४५,०००/- रु स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आलोसे व आरोपी यांची नावे व हुद्दा | :- | १) रविंद्र वांडेकर, पद- कृषी सहाय्यक, तालुका कृषी कार्यालय गंगापूर अंतर्गत जंभाळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद<br>२) किशोर काशीनाथ कांडेकर रा. पेकळवाडी ता. गंगापूर जि. औरंगाबाद (खाजगी इसम) |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे दौलताबाद, औरंगाबाद (शहर) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षिरसागर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १,४५,०००/- रुपयाची मागणी करुन १,४५,०००/- रुपये स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे सिताफळ बागेकरीता महाराष्ट्र शासन प्रमाणीत फळबाग अनुदान मंजुर केलेले आहे. सदर अनुदान मंजुर करुन दिलेल्या कामाचा मोबदला म्हणुन |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | धुळे सोलापुर हायवे रोडवरील फतीयाबाद ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील हॉटेल राजपुताना समोरील मोकळ्या जागेत |

१) तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :- यातील तक्रारदार यांचे वडिलांचे नावे ईस्माईलपुर ता. गंगापूर शिवार येथे शेत जमीन आहे. त्यामध्ये सिताफळाची लागवड केल्याने त्या सिताफळ बागेकरीता महाराष्ट्र शासन प्रमाणीत फळबाग अनुदान मंजुर झालेले आहे. सदर अनुदान मंजुर करुन दिल्याच्या कामाचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांचेकडे रविंद्र वांडेकर, पद- कृषी सहाय्यक, तालुका कृषी कार्यालय गंगापूर अंतर्गत जंभाळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद हे १,४५,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, रविंद्र वांडेकर, पद- कृषी सहाय्यक, तालुका कृषी कार्यालय गंगापूर अंतर्गत जंभाळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद याने तक्रारदार यांचेकडे १,४५,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, रविंद्र वांडेकर, पद- कृषी सहाय्यक, तालुका कृषी कार्यालय गंगापूर अंतर्गत जंभाळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांनी किशोर काशीनाथ कांडेकर (खाजगी इसम) यांचे मार्फतीने १,४५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन दौलताबाद, औरंगाबाद (शहर) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना याकामी पोना बाळा राठोड, अशोक नागरगोजे, रविंद्र काळे, चालक पोअं चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.**
**औरंगाबाद.**